पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या बागेत लावलेला पिवळा झेंडू बहरला आहे. झुबकेबाज झेंडूच्या फुलांनी विद्यापीठ परिसराचे सौंदर्य आणखी खुलले आहे. (छाया : अर्जुन टाकळकर)

पुढारी

# विद्यापीठ पत्रकारिता विभागात एकाचवेळी पाच संशोधक विद्यार्थ्यांना पीएच.डी.

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या जर्नालिझम व मास कम्युनिकेशन विभागातील पाच संशोधक विद्यार्थ्यांनी पीएच.डी प्रबंध सादर केला. त्यापैकी चार विद्यार्थ्यांना नुकतीच विद्यापीठाची पीएच.डी पदवी जाहीर झाली आहे. एकाच मार्गदर्शकाखाली पाच विद्यार्थ्यांनी पीएच.डी प्रबंध सादर करण्याची ही विद्यापीठातील पहिलीच घटना आहे.

अनुराधा इनामदार यांनी कॉर्पोरेट कम्युनिकेशन इन टाटा ग्रुप-अॅन अॅनॅलिटिकल स्टडी ऑफ हायपर मार्केट स्टार बझार इन वेस्टर्न महाराष्ट्र तर सुप्रिया शेलार यांनी इम्पॅक्ट ऑफ प्रिंट मिडिया ऑन पब्लिक अंडरस्टॅडिंग ऑफ एन्व्हायर्नमेंटल इश्युज ऑफ वेस्टर्न घाट्स, महाराष्ट्र विथ रेफरन्स टू दाजीपूर वाईल्ड लाईफ सॅंच्युरीज विषयावर प्रबंध सादर केला. चंद्रशेखर वानखेडे-यांनी इंग्लिश जर्नालिझम इन महाराष्ट्र विथ स्पेशल रेफरन्स : न्यू पेपर्स विषयावर तर तानाजी पाटील यांनी इम्पॅक्ट ऑफ सोशल अँड बिहेव्हरल चेंज कम्युनिकेशन ऑन रूरल सॅनिटेशन प्रोग्राम विथ स्पेशल रेफरन्स टू कोल्हापूर डिस्ट्रीक्ट या विषयावर डॉ.निशा मुडे-पवार यांच्या मार्गदर्शनाखाली प्रबंध पूर्ण केला. सुनिलकुमार सरनाईक यांना डॉ.प्रताप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली नुकतीच पीएच.डी पदवी जाहीर झाली आहे.

09 MAY 2023

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ प्रवेश परीक्षेला ३ हजार ६९६ विद्यार्थी

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने सोमवारी घेण्यात आलेल्या पाच विषयांच्या ऑफलाईन प्रवेश परीक्षा सुरळीतपणे पार पडल्या. ३ हजार ८१६ विद्यार्थ्यांपैकी ३ हजार ६९६ विद्यार्थी उपस्थित होते.

विद्यापीठाच्या वतीने २०२३-२४ शैक्षणिक वर्षामध्ये विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठ अधिविभागात पदव्युत्तर अभ्यासक्रमांना नियमित प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची प्रवेश परीक्षा ८ ते ११ मे या कालावधीत ऑफलाईन पद्धतीने कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, बेळगाव जिल्ह्यांमध्ये आयोजित केली आहे. २६ अभ्यासक्रमांतील विषयांसाठी ६ हजार ४४९ विद्यार्थी परीक्षेला बसणार आहेत. विद्यापीठ कार्यक्षेत्रात १६ परीक्षा केंद्रे आहेत. परीक्षा सुरळीत होण्यासाठी महाविद्यालयीन स्तरावर विद्यापीठ समन्वयकांची नियुक्ती केली आहे. दरम्यान, सोमवारी एमएस्सी (केमेस्ट्री), एमएस्सी (मायक्रोबायालॉजी), एमएस्सी (मॅथ्स), एमएस्सी (झूलॉजी), एमएस्सी (फिजिक्स) या पाच विषयांच्या परीक्षा तीन सत्रांत घेण्यात आल्या. परीक्षा सुरळीतपणे झाल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

# शिवाजी विद्यापीठाच्या प्रवेश परीक्षा सुरू

## पहिल्या दिवशी ३६९६ परीक्षार्थी



कोल्हापूर, ता. ८ : शिवाजी विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा सोमवारपासून सुरू झाल्या. त्यात पहिल्या दिवशी एम. एस्सी. केमिस्ट्री, मायक्रोबायोलॉजी, मॅथेमेटिक्स, झूलॉजी, फिजिक्स या पाच अभ्यासक्रमांच्या ३६९६ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली, तर १२० जण गैरहजर राहिले.

विद्यापीठातील अधिविभाग आणि संलग्नित महाविद्यालयांमध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रमांना नियमित प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची प्रवेश परीक्षा सोमवारपासून गुरुवार (ता. ११) पर्यंत ऑफलाईन स्वरूपात घेण्याचे नियोजन परीक्षा व मूल्यमापन मंडळाने केले आहे.

या परीक्षांसाठी कोल्हापूरमध्ये ५, सांगलीत ३, सातारामध्ये ६, तर सोलापूर आणि बेळगावमध्ये प्रत्येकी एक परीक्षा केंद्र आहे. या केंद्रांवर सकाळी १०.३० ते दुपारी १२, दुपारी १ ते २.३० आणि दुपारी ३.३० ते सायंकाळी ५ या सत्रांमध्ये परीक्षा घेण्याचे नियोजन केले आहे. त्यानुसार पहिल्या दिवशी परीक्षा झाली. उद्या, मंगळवारी विविध ११ अभ्यासक्रमांच्या परीक्षा होणार आहेत.

### 'एमएचटी-सीईटी' आजपासून

■ अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (एमएचटी-सीईटी) उद्या मंगळवार (ता. ९) ते रविवार (ता. १४) दरम्यान कोल्हापूर जिल्ह्यातील आठ केंद्रांवर परीक्षा होणार आहे. त्यात पीसीएम ग्रुपची परीक्षा रविवारपर्यंत, तर पीसीबी ग्रुपची परीक्षा १६ ते २१ मे दरम्यान होणार आहे. सकाळी साडेसात ते दुपारी बारा आणि दुपारी साडेबारा ते सायंकाळी पावणेसात अशा सत्रांमध्ये परीक्षा घेतली जाणार आहे.

तरुण भारत

# विद्यापीठ प्रवेश परीक्षा सुरळीत

कोल्हापूर : सन २०२३-२०२४ या शैक्षणिक वर्षामध्ये विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठातील विविध अधिविभागात पदव्युत्तर अभ्यासक्रमांना नियमित प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची प्रवेश परीक्षेला सोमवारपासून प्रारंभ झाला आहे. या प्रवेश परीक्षा ११ मेपर्यंत सुरू राहणार आहेत. ही परीक्षा ऑफलाईन पद्धतीने कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, बेळगाव या जिल्ह्यांमध्ये आयोजित केली आहे. सोमवारी एमएस्सी केमेस्ट्री, मायक्रोबायोलॉजी, मॅथमॅटीक्स, झुलॉजी, फिजिक्स अशा पाच विषयांची परीक्षा तीन सत्रात सुरळीत पार पडली. या परीक्षेला ३८१६ विद्यार्थांपैकी ३६९६ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.